निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
पाने : ४
किंमत : २.००
वर्ष : १५ वे
अंक : २८२ वा.
मंगळवार :१६ डिसेंबर २०२५

मुख्य संपादक- सुग्रीव मुंडे | E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. ABD-441/2024-26 | RNI.No.MAH/MAR2011/39247

## ४३० कोटींच्या विविध विकासकामांचे उद्धाटन, भूमिपूजन व लोकार्पण

# इचलकरंजी पाणी पुरवठा व जीएसटी परतावा प्रश्नी लवकरच कार्यवाही - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**आत्ताच एक्सप्रेस**

**कोल्हापूर, (इचलकरंजी) प्रतिनिधी/** महाराष्ट्राचे मिनी मँचेस्टर म्हणून ओळख असलेल्या आणि औद्योगिक कामगार नगरी असलेल्या इचलकरंजी शहराचा सुरळीत पाणीपुरवठा तसेच महानगरपालिकेच्या कोट्यवधीचा जीएसटी परतावा प्रश्नी लवकरच कार्यवाही करणार असल्याचे आश्वासन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. इचलकरंजी शहरात अंदाजित ४३० कोटी रुपयांच्या विविध विकासकामांच्या उद्धाटन, भूमिपूजन व लोकार्पण सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते.







यावेळी व्यासपीठावर पालकमंत्री प्रकाश आबिटकर, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील, खासदार धनंजय महाडिक, खासदार धैर्यशिल माने, आमदार डॉ. राहूल आवाडे, आमदार अशोक माने, जिल्हाधिकारी अमोल येडगे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिकेयन एस, इचलकरंजी मनपा आयुक्त पल्लवी पाटील, माजी आमदार प्रकाश आवाडे, माजी आमदार सुरेश हाळवणकर आदी मान्यवर उपस्थित होते.

सुमारे ४३० कोटी रुपये खर्च करून इचलकरंजी शहरातील महानगरपालिका क्षेत्रात १० तर ५ ग्रामीण भागात विकासकामे करण्यात येणार आहेत.

यामध्ये पंचगंगा प्रदूषण उपाययोजनेअंतर्गत औद्योगिक सांडपाणी प्रक्रियेसाठी (मनपा व एमआयडीसी क्षेत्र) ३६१.३१ कोटी, ग्रामीण भागात (जिल्हा परिषद) ५.७५ कोटी, तर शहरात ६२.७७ कोटी रुपयांची विविध विकासकामे करण्यात येणार आहेत. या विविध विकासकामांचे उद्धाटन मुख्यमंत्री फडणवीस यांनी कळ दाबून (रिमोटद्वारे) केले.

### जीएसटी परतावा मिळणार

मुख्यमंत्री फडणवीस पुढे म्हणाले, पुढील पाच वर्षांत जीएसटीच्या परताव्यासंदर्भातील प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असून लवकरच जीएसटीचा आवश्यक तो परतावा इचलकरंजीकरांना मिळेल. शहराच्या विकासाकरिता आणि येथील उद्योगांसाठी योग्य ती कार्यवाही करून इचलकरंजी शहराचा चेहरामोहरा बदलू, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

### 'श्री शंभूतीर्थ' पुतळ्याचे लोकार्पण

इचलकरंजी महानगरपालिकेच्या वतीने शहरातील कॉ. के. एल. मलाबादे चौक सुशोभीकरण अंतर्गत उभारण्यात आलेल्या छत्रपती संभाजी महाराजांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे 'श्री शंभूतीर्थ' म्हणून लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते संपन्न झाले.

धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज स्मारक समिती आणि इचलकरंजी महानगरपालिकेच्यावतीने हा पूर्णाकृती पुतळा उभारण्यात आला आहे.

पुतळ्याच्या अनावरणावेळी मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, महानगरपालिकेसह येथील नागरिकांनी पुढाकार घेऊन लोकसहभागातून हा पुतळा उभारला आहे.

यातील जनसहभाग महत्त्वाचा असून, हे एका अर्थाने जनतेचे स्मारक आहे.

छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रेरणेने लोकांमध्ये तेज निर्माण होते. महाराजांचा इतिहास देदिप्यमान असून, तो प्रत्येकापर्यंत पोहोचला पाहिजे, असे मत त्यांनी व्यक्त केले.

या सोहळ्यासाठी संभाजी भिडे गुरुजी यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर तसेच इतिहासप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. तत्पूर्वी इचलकरंजी येथील हेलिपॅडवर आमदार डॉ. राहूल आवाडे, माजी आमदार प्रकाश आवाडे आणि इचलकरंजी महापालिका आयुक्त पल्लवी पाटील यांनी त्यांचे स्वागत केले.

## 'महा-देवा प्रोजेक्ट'साठी फुटबॉल टीम तयार करा - राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे

**मुंबई**/राज्यातील सर्व विद्यापीठांअंतर्गत महाविद्यालयांमध्ये प्रत्येक खेळाडूंची भारत स्पोर्ट्स पोर्टल वर नोंद करून महा-देवा प्रोजेक्टसाठी फुटबॉल टीम तयार करण्याचे निर्देश राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे यांनी दिले.




'लोकभवन' येथे महा-देवा प्रोजेक्ट तसेच इतर खेळांच्या प्रगतीसंदर्भात राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे यांच्या अध्यक्षतेखाली दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला राज्यपालांचे उपसचिव राममूर्ती, लोकभवनमधील सह संचालक (वै. वि. मं.) विकास कुलकर्णी तसेच दूरदृश्यप्रणाली द्वारे सर्व विद्यापीठाच्या क्रीडा विभागाचे संचालक उपस्थित होते.

सचिव डॉ. प्रशांत नारनवरे म्हणाले की, राज्यपाल महोदय यांच्या सूचनांनुसार प्रत्येक महाविद्यालयातील खेळाडूंची नोंद होणे गरजेचे आहे. यासाठी क्रीडा विभागाने भारत स्पोर्ट्स पोर्टलवर प्रत्येक महाविद्यालयांतर्गत कोणता खेळ खेळाडू खेळतोय याची नोंद करावी, यासाठी प्रत्येक महाविद्यालयांनी एक मोहीम राबवावी. सर्व विद्यापीठांनी आपल्या अंतर्गत असलेल्या महाविद्यालयांच्या क्रीडा संचालकांना याबाबत आवश्यक त्या सूचना द्याव्यात. खेळांसाठी चांगल्या प्रकारच्या मार्गदर्शक सूचना खेळाडूंना मिळण्यासाठी क्रीडा विभागाने जोमाने काम करावे.

सचिव डॉ. प्रशांत नारनवरे म्हणाले की, छत्रपती शिवाजी क्रीडा प्रतिष्ठानने याबाबत महत्त्वपूर्ण भूमिका निभावून यामध्ये थलेटिक्स ,कबड्डी त्याचप्रमाणे विविध खेळांसाठी असलेल्या खेळाडूंची नोंद करावी जेणेकरून खेळाडूंची माहिती एकत्र उपलब्ध होईल. दर आठवड्यात करण्यात आलेल्या कामांचा आढावा घेण्यात येणार आहे. शाळा महाविद्यालयांमध्ये प्रत्यक्ष क्रीडा अधिकाऱ्यांनी भेट देऊन याबाबत जनजागृती करावी. भारत स्पोर्ट्स पोर्टल वरती प्रत्येक विद्यार्थ्याचे अकाउंट तयार झाल्यानंतर एकाच प्लॅटफॉर्मवर ती सर्व माहिती उपलब्ध होईल.

सचिव डॉ. प्रशांत नारनवरे म्हणाले की, एकदा खेळाडूंची नोंद झाल्यानंतर स्थानिक स्तरावरील स्पर्धेप्रमाणे विद्यापीठ स्तरावर विविध स्पर्धांचे आयोजन करण्यासाठी मदत होईल. तालुका जिल्हा राज्य राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू निर्माण होण्यासाठी मदत होईल. नुकतेच जागतिक फुटबॉलपटू लिओनोल मेस्सी मुंबईत आले होते. महाराष्ट्र शासनाचा 'महा-देवा प्रोजेक्ट' हा सुरू झाला असून त्यामध्ये फुटबॉल टीमसाठी मार्गदर्शन करण्यात येणार आहे. प्रत्येक महाविद्यालयाने फुटबॉल टीम तयार करावी जेणेकरून चांगल्या खेळाडूंची निर्मिती होईल. सर्वांनी उत्स्फूर्तपणे काम केल्यास नक्कीच प्रत्येक खेळाडूंची चांगल्या प्रकारे नोंदणी होऊन आपल्याला क्रीडा क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करता येईल असेही ते म्हणाले.

# महायुती संदर्भात फडणवीसांचे विधान

## 'मी आणि अजित पवार वेगळे....', महापालिका निवडणुका जाहीर होताच उच् फडणवीसांची मोठी घोषणा, 'आमच्यात कटुता...'

**मुंबई/** महापालिका निवडणुका जाहीर होताच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली असून, महायुतीसंदर्भातील आपले धोरण स्पष्ट केले आहे. राज्यातील सर्व २९ महानगरपालिकांच्या निवडणुकांचा वेळ एकाचवेळी जाहीर झाला असून, मतदान १५ जानेवारीला होईल आणि निकालाची घोषणा १६ जानेवारीला केली जाणार आहे. या पार्श्वभूमीवर फडणवीसांनी महापालिकांमध्ये युती कशी रचली जाईल यावर स्पष्ट मत व्यक्त केले.

फडणवीस म्हणाले की, आम्ही महायुती करण्याचा प्रयत्न करत आहोत आणि जास्तीत जास्त ठिकाणी भाजप आणि शिवसेनेची युती असेल. काही ठिकाणी भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी युती होईल, तर काही ठिकाणी भाजप-राष्ट्रवादीची युती दिसू शकेल. पुण्याच्या परिस्थितीवर बोलताना त्यांनी स्पष्ट केले की, पुण्यात भाजप आणि राष्ट्रवादी कॉँग्रेस कदाचित समोरासमोर लढतील, परंतु ही मैत्रीपूर्ण लढत असेल, कोणतीही कटुता नसेल. भाजपाने पाच वर्षांमध्ये पुण्याचा विकास चांगल्या प्रकारे केला आहे, त्यामुळे निवडणूक ही विकासावर आधारित असेल.

नागपूर आणि चंद्रपूर महापालिकांबाबत ते म्हणाले की, या दोन महानगरपालिकांमध्ये आरक्षण ५० टक्क्यांपेक्षा जास्त आहे, परंतु सुप्रीम कोर्टाच्या आदेशानुसार निवडणूक पार पाडली जाईल. जो निकाल येईल तो आमच्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहील, आणि आम्ही जे निर्णय घेऊ तो फक्त या दोन महानगरपालिकांवर लागू होईल.

फडणवीसांनी महापालिका निवडणुका जाहीर होण्याबाबतही समाधान व्यक्त केले. ते म्हणाले, राज्य निवडणूक आयोगाने महापालिका निवडणुकीच्या तारखा जाहीर केल्याचा मला आनंद आहे. या निर्णयाचे आम्ही स्वागत करतो. स्थानिक स्वराज्य संस्था प्रशासकांच्या भरवशावर चालणे हे लोकशाहीसाठी योग्य नव्हते. न्यायालयाच्या निर्णयामुळे या संस्था दीर्घकाळ निर्वाचित प्रतिनिधींच्या अभावात होत्या. आता पुन्हा निवडणूक होत आहे आणि आमच्या शासनाने केलेल्या विकासकामांच्या जोरावर जनता पुन्हा शहर विकासाची संधी देईल अशी अपेक्षा आहे.

मुंबईतील ठाकरे बंधूंच्या युतीबाबतही त्यांनी प्रतिक्रिया दिली. ठाकरे बंधू एकत्र आले तरी, कॉँग्रेससोबत गेली तरी मुंबईकर आमच्या महायुतीलाच निवडून देतील. आमचा कारभार, केलेला विकास आणि मराठी माणसाच्या हितासाठी केलेल्या



प्रयत्नांमुळे सामान्य मुंबईकर आमच्यासोबत राहतील, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले.

एकंदरीत, महापालिका निवडणुका जाहीर होताच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या पक्षाचे धोरण, युतीसंबंधी धोरण आणि पुणे, नागपूर, चंद्रपूरसारख्या महत्त्वाच्या शहरांमध्ये पक्षाची भूमिका स्पष्ट केली आहे. त्यांनी स्पष्ट केले की, विकासकाम, मैत्रीपूर्ण स्पर्धा आणि जनता केंद्रित धोरण हेच निवडणुकीतील आमचे मुख्य मुद्दे असतील.

# IT सेक्टर नंतर पुण्याच्या ऑटोमोबाईल निर्मिती सेक्टरमध्ये मोठा भूकंप! जगप्रसिद्ध कार निर्मीती कंपनी २,३०० कर्मचाऱ्यांना तळडदेऊन घरी पाठवणार

**पुणे/** IT सेक्टर नंतर पुण्याच्या ऑटोमोबाईल निर्मिती सेक्टरमध्ये मोठा भूकंप आला आहे. जगप्रसिद्ध फोक्सवॅगन कार निर्माती कंपनी चाकणमधील प्लांटमधून २,३०० कर्मचाऱ्यांना तठड देऊन घरी पाठवणार आहे. ही स्वेच्छानिवृत्ती योजना महाराष्ट्रातील फोक्सवॅगन ग्रुपच्या दोन्ही प्लांटमध्ये लागू करण्यात आली आहे. या प्लांटमध्ये स्कोडा कुशाक एसयूव्ही, फोक्सवॅगन व्हर्टस सेडान आणि ऑडी क्यू३ आणि क्यू५ सारख्या कारचे उत्पादन केले जाते.

भारतीय ऑटोमोबाईल क्षेत्रात गेल्या दोन दशकांहून अधिक काळापासून फोक्सवॅगन ग्रुपचा मोठा दबदबा आहे. याच फोक्सवॅगन कंपनीने एक मोठे पाऊल उचलले आहे. कंपनीने देशातील त्यांच्या दोन उत्पादन प्रकल्पांमध्ये काम करणाऱ्या २,३०० कर्मचाऱ्यांना लवकर निवृत्तीचे पर्याय दिले आहेत. हा निर्णय अशा वेळी आला आहे जेव्हा भारतातील कंपनीचा बाजार हिस्सा सुमारे २ टक्के स्थिर आहे आणि उत्पादन क्षमता कमी वापरली जात आहे.

महाराष्ट्रातील फोक्सवॅगन ग्रुपच्या दोन्ही प्लांटमध्ये ही स्वेच्छा निवृत्ती योजना लागू करण्यात आली आहे. हे प्लांट देशांतर्गत आणि निर्यात बाजारपेठेसाठी स्कोडा कुशाक एसयूव्ही, फोक्सवॅगन व्हर्टस सेडान आणि ऑडी क्यू३ आणि क्यू५ सारखे प्रीमियम मॉडेल तयार करतात. सध्या, दोन्ही युनिट्स पूर्ण क्षमतेपेक्षा कमी क्षमतेने कार्यरत आहेत, त्यामुळे सध्याच्या गरजांनुसार मनुष्यबळ संतुलित करणे कंपनीसाठी प्राधान्य आहे.

कंपनीच्या प्रवक्त्याने दिलेल्या माहितीनुसार, पुणे आणि चाकण येथील उत्पादन केंद्रांवर गेल्या काही वर्षांपासून संघटनांशी वाटाघाटी सुरू आहेत. या चर्चा आणि कर्मचाऱ्यांच्या विनंत्यांवर आधारित, स्वेच्छा निवृत्ती योजना (तठड) लागू करण्यात आली आहे. ही योजना पूर्णपणे ऐच्छिक आहे आणि सामाजिक जबाबदारी पूर्ण करताना कर्मचाऱ्यांना फायदा मिळवून देण्याचे उद्दिष्ट आहे. कंपनीचे म्हणणे आहे की यामुळे कार्यक्षमतेत वाढ होईल.

२०२६ मध्ये विक्रीत ३८ टक्के वाढ होण्याची शक्यता आहे. कारण ४ मीटरपेक्षा कमी लांबीच्या विभागात कायलॅक लाँच करण्यात आला आहे. कंपनीच्या मते, त्यांच्या सहा ब्रँडमधील नवीन मॉडेल्सनी बाजारपेठेतील हिस्सा सुधारला आहे. वाढ आणखी मजबूत करण्याची त्यांची योजना आहे. असे असूनही, उत्पादन आणि कर्मचाऱ्यांची संख्या संतुलित करणे आवश्यक मानले गेले. यामुळे कंपनीने कर्मचारी कपात करण्याबाबत मोटा निर्णय घेतला आहे.

ही योजना स्वीकारणाऱ्या कर्मचाऱ्यांना प्रत्येक सेवेच्या वर्षासाठी किंवा निवृत्तीपर्यंत उर्वरित वर्षे, यापैकी जे कमी असेल त्या प्रत्येकासाठी ७५ दिवसांचा पगार मिळेल. याव्यतिरिक्त, जर कर्मचाऱ्यांनी पाच ते दहा दिवसांच्या आत ऑफर स्वीकारली तर त्यांना अतिरिक्त पेमेंट देखील मिळेल. रॉयटर्सच्या एका वृत्तानुसार, सूत्रांचा हवाला देऊन, कंपनीचे ध्येय मनुष्यबळाचे तर्कसंगतीकरण करणे आणि सध्याच्या गरजांशी जुळवून घेणे आहे. फोक्सवॅगन त्यांचे प्लांट चालवत राहील आणि कर्मचाऱ्यांना पगार देईल. महत्त्वाचे म्हणजे, ही लवकर निवृत्ती योजना कर्मचारी संघटनेच्या विनंतीवरून सुरू करण्यात आली.




स्कोडा ऑटो फोक्सवॅगन २०१८ पासून भारतात समूहाच्या धोरणाचे नेतृत्व करत आहे. पुढील गुंतवणुकीसाठी स्थानिक भागीदार शोधत आहे. दरम्यान, कंपनी १.४ अब्ज डॉलर्सच्या आयात कराच्या मागणीला आव्हान देत आहे, जी ती अन्याय्य मानते. भारतात स्कोडा, फोक्सवॅगन, ऑडी, पोर्शे, लॅम्बोर्गिनी आणि बेंटले सारख्या ब्रँडची उपस्थिती असूनही, बाजारपेठेतील वाटा लक्षणीय वाढला आहे.

# सर्वांचा लाडका, हरहुन्नरी 'लक्ष्या'

जवळपास दोन ते अडीच दशके मराठी प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारा, अभिनय, विनोद आणि सहजतेचा अद्भुत संगम म्हणजे 'लक्ष्या'– अर्थात लक्ष्मीकांत बेर्डे. आज त्यांचा स्मृतिदिन. मराठी चित्रपटसृष्टीच्या इतिहासात लक्ष्या हे नाव केवळ एका अभिनेत्यापुरते मर्यादित नसून ते एका संपूर्ण काळाचे, एका आनंदी पर्वाचे प्रतीक आहे. लक्ष्या शिवाय मराठी चित्रपटाचा इतिहास पूर्ण होऊच शकत नाही, इतका तो प्रेक्षकांच्या हृदयात खोलवर रुजलेला कलाकार होता.

लक्ष्मीकांत बेर्डे हे त्यांचे खरे नाव असले, तरी 'लक्ष्या' हे नाव त्यांना प्रेक्षकांनी प्रेमाने बहाल केले. हे नावच त्यांच्या लोकप्रियतेचे, आपुलकीचे आणि माणुसकीचे प्रतीक बनले. लक्ष्या हा मराठी प्रेक्षकांना आपल्यातीलच एक वाटायचा.

म्हणूनच दहा वर्षांच्या मुलापासून ते ऐंशी वर्षांच्या आजोबांपर्यंत सर्वांनी त्याच्यावर मनापासून प्रेम केले. तो पडद्यावर आला की घराघरांत हसू पसरायचे, चिंतेला थोडा विसर पडायचा.

लक्ष्याचा जन्म २६ ऑक्टोबर १९५४ रोजी झाला. लहानपणापासूनच अभिनयाची ओढ, रंगभूमीची आवड आणि प्रेक्षकांचे मनोरंजन करण्याची आस त्याच्या मनात होती. अभिनय कारकिर्दीची सुरुवात त्याने 'टुरटुर' या नाटकातून केली. हे नाटक प्रचंड गाजले आणि त्यातील लक्ष्याची भूमिका प्रेक्षकांच्या विशेष लक्षात राहिली. सहज अभिनय, अचूक टायमिंग आणि नैसर्गिक विनोद यामुळे तो क्षणातच नाट्यरसिकांचा लाडका बनला.

यानंतर 'शांतेचं कार्ट चालू आहे', 'बिघडले स्वर्गाचे दार' यांसारख्या नाटकांतून त्याने साकारलेल्या विनोदी भूमिका प्रेक्षकांना प्रचंड भावल्या. ही नाटकेही गाजली आणि लागोपाठ मिळालेल्या यशामुळे लक्ष्या नाट्यसृष्टीतील आघाडीचा विनोदी अभिनेता म्हणून ओळखला जाऊ लागला. रंगभूमीवर मिळालेल्या यशाने त्याच्यासाठी चित्रपटसृष्टीची दारे खुली झाली.

मराठी चित्रपटसृष्टीतही त्याला प्रामुख्याने विनोदी भूमिकाच मिळाल्या. मात्र या भूमिकांचे त्याने अक्षरशः सोने केले. साध्या संवादातूनही हास्य निर्माण करण्याची कला, देहबोलीतून विनोद साकारण्याची हातोटी आणि चेहऱ्यावरच्या निरागस भावांनी तो प्रेक्षकांच्या मनात घर करून बसला. 'लक्ष्या' हे नाव आबालवृद्धांमध्ये घराघरांत पोहोचले आणि त्याचे चित्रपट तिकीटबारीवर यशस्वी होऊ लागले.

महेश कोठारे यांच्यासोबत जमलेली त्याची जोडी तर मराठी चित्रपटसृष्टीतील सुवर्णअध्याय ठरली. महेश कोठारेंचा चित्रपट आणि लक्ष्या नसणे, हे जवळजवळ अशक्यच होते.

ही जोडी म्हणजे यशाची खात्री अशी ओळख निर्माण झाली होती. 'धूमधडाका', 'धडाकेबाज', 'थरथराट', 'दे दणादण', 'झपाटलेला' यांसारखे अनेक चित्रपट प्रचंड यशस्वी ठरले. हे चित्रपट केवळ हिटच झाले नाहीत, तर प्रेक्षकांनी अक्षरशः डोक्यावर घेतले. आजही हे चित्रपट पाहताना प्रेक्षक तितक्याच मनापासून हसतात.

सचिन पिळगावकर यांच्यासोबत केलेला 'अशी ही बनवा बनवी' हा चित्रपटदेखील मराठी चित्रपटसृष्टीतील मैलाचा दगड ठरला. याशिवाय लक्ष्या आणि अशोक सराफ यांची जोडीही तितकीच लोकप्रिय झाली.

८० आणि ९० च्या दशकात या जोडीने मराठी चित्रपटसृष्टीत अक्षरशः धुमाकूळ घातला. ही जोडी म्हणजे मराठी चित्रपटसृष्टीतील 'राम-लक्ष्मण' अशीच ओळखली जाऊ लागली. दोघांचे ट्युनिंग, संवादफेक आणि अभिनयातील सहजता प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करायची. या दोघांनी मराठी मनांचे भरपूर मनोरंजन केले, अनेकांच्या आयुष्यातील तणाव, दुःख विसरायला लावून आनंदाचे क्षण दिले.

मराठीत लोकप्रियतेच्या शिखरावर असताना लक्ष्याला हिंदी चित्रपटसृष्टीतूनही चांगल्या ऑफर्स येऊ लागल्या. त्याने काही भूमिका स्वीकारल्या. 'मैने प्यार किया' या राजश्री प्रॉडक्शन्सच्या चित्रपटात सलमान खानच्या मित्राची भूमिका त्याने प्रभावीपणे साकारली.

मात्र हिंदीत त्याला त्याच्या अभिनय क्षमतेला पूर्ण वाव देतील अशा भूमिका फारशा मिळाल्या नाहीत. त्याची खरी ओळख, खरी ताकद आणि खरी जादू मराठी चित्रपटसृष्टीतच फुलली.

पु. ल. देशपांडे लिखित आणि जब्बार पटेल दिग्दर्शित 'एक होता विदूषक' या चित्रपटात लक्ष्याने साकारलेली गंभीर भूमिका त्याच्या अभिनय कारकिर्दीतील मैलाचा दगड ठरली. या चित्रपटातून त्याने आपण केवळ विनोदी अभिनेता नाही, तर एक संवेदनशील, कसदार अभिनेता आहोत हे सिद्ध केले. जरी हा चित्रपट तिकीटबारीवर अपयशी ठरला, तरी त्यातील त्याच्या भूमिकेने त्याला अनेक पुरस्कार मिळवून दिले आणि समीक्षकांनीही त्याच्या अभिनयाचे भरभरून कौतुक केले.

विनोदी भूमिका अधिक केल्या म्हणून लक्ष्या म्हणजे फक्त विनोदी अभिनेता असे म्हणणे हा त्याच्यावर अन्याय ठरेल. 'एक होता विदूषक', 'लेले विरुद्ध लेले', 'सर आले धावून' यांसारख्या नाटकांतून आणि चित्रपटांतून त्याने गंभीर भूमिकाही तितक्याच ताकदीने साकारून दाखवल्या.

आयुष्यभर प्रेक्षकांना हसवणारा, आनंद देणारा हा कलाकार १६ डिसेंबर २००४ रोजी प्रेक्षकांना दुःखाच्या सागरात बुडवून काळाच्या पडद्याआड गेला. मात्र आजही त्याचे चित्रपट, त्याचे संवाद, त्याचा निरागस चेहरा आणि त्याचे खळखळून हसवणारे अभिनय प्रेक्षकांच्या मनात जिवंत आहेत.

विनोदाचा अचूक टायमिंग, अभिनयाची दैवी देणगी आणि प्रेक्षकांशी नातं जपणारा हा सर्वांचा लाडका, हरहुन्नरी 'लक्ष्या' कायम मराठी मनांत अढळ स्थान राखून आहे. त्यांच्या स्मृतिदिनी त्या महान कलाकाराला विनम्र अभिवादन!

# सूर्यपुत्र भैय्यासाहेब आंबेडकर यांची जयंती जालन्यात उत्साहात साजरी!

**आत्ताच एक्सप्रेस जालनाप्रतिनिधी/** वंचित बहुजन आघाडीच्या वतीने सूर्यपुत्र भैय्यासाहेब आंबेडकर यांची ११३ वी जयंती वंचित बहुजन आघाडी मराठवाडा विभागीय जनसपर्क कार्यालय, मंठा बायपास रोड,अंबड चौफुली जालना येथे उत्साहात साजरी करण्यात आली. फुले-शाहू-आंबेडकरी चळवळीसह भारतीय बौद्ध महासभेचे कार्य देश-विदेशात पुढे नेण्यात भैय्यासाहेब आंबेडकरांचे मोलाचे योगदान होते, असे मत यावेळी उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वंचित बहुजन आघाडीचे मराठवाडा उपाध्यक्ष दिपक डोके हे होते. तर प्रमुख उपस्थितीमध्ये जिल्हा उपाध्यक्ष प्रमेश्वर खरात आणि सम्यक विध्यार्थी आंदोलनचे जिल्हाध्यक्ष सुरज सोनोवने, जेके फाऊंडेशन चे संस्थापक जावेद खान, भारतीय बौद्ध महासभाचे तालुकाध्यक्ष भास्कर गाढेकर उपस्थित होते.

**अनेक कार्यकर्त्यांची उपस्थिती**



यावेळी गौतम पाडमुख,मुनव्वर शेख .आदिल शेख मदन पहाडे सुनील पाईक राव .गुलाबराव लहाने,इत्यादी कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे संचालन भास्कर गाडेकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन गौतम पाडमुख यांनी केले.

# शनि अमावस्येच्या पावन पर्वावर पैठण येथे जैन धर्मियांचे श्रद्धास्थान

शनि अमावस्येच्या पावन पर्वावर पैठण येथे जैन धर्मियांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री शनि ग्रह अरिष्ठ निवारक मुनिसुव्रतनाथ भगवान अतिशय क्षेत्र येथे भव्य आणि दिव्य अशा महामस्तक अभिषेक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. हा सोहळा शनिवार, दि. २० डिसेंबर रोजी अत्यंत भक्तिमय वातावरणात संपन्न होणार असून, महाराष्ट्रासह देशाच्या विविध भागांतून हजारो भाविक या महोत्सवाला उपस्थित राहणार आहेत.



या पवित्र महोत्सवाचे वैशिष्ट्य म्हणजे आचार्य गुप्तीनंदी गुरुदेव ससंघाची मंगल उपस्थिती लाभणार असून, तसेच अंतर्मना आचार्य श्री. प्रसन्नसागरजी महाराज यांच्या आशीर्वादाने संपूर्ण कार्यक्रम पार पडणार आहे. जैन धर्मियांसाठी शनि अरिष्ठ निवारणाचे अत्यंत प्रभावी आणि श्रद्धेचे केंद्र असलेल्या या तीर्थक्षेत्री शनि अमावस्येला विशेष धार्मिक महत्त्व असून, भाविक मोठ्या श्रद्धेने अभिषेक व पूजनासाठी येथे येतात.

महोत्सवाच्या कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ८.०० वाजता भगवान मुनिसुव्रतनाथ विधानाने होणार असून, त्यानंतर धर्मध्वजारोहनाचा सोहळा** पार पडणार आहे. दिवसभर अभिषेक, पूजन, मंत्रोच्चार, धार्मिक विधी आणि प्रवचनांच्या माध्यमातून संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघणार आहे.

या महोत्सवासाठी विविध क्षेत्रांतील मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे. प्रमुख अतिथी म्हणून **नितीन नखाते (नागपूर), देवेंद्र बाकलीवाल (पुणे), सी.ए. आनंद काकरीया (पुणे), योगेश पाडे, नरेंद्र पहाडे (जालना), मनोज चौधरी (हैद्राबाद), अशोक जैन (दिल्ली), डॉ. के. एम. गंगवाल (पुणे) आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

या शुभप्रसंगी उपस्थित राहणाऱ्या हजारो भाविकांसाठी महाप्रसादाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. हा महाप्रसाद श्रीमती सुशिला श्रीपाल कासलीवाल, संतोष, सौ. प्रिया, यश, निर्मीत, निश्चय कासलीवाल परिवार तसेच सुनील वुडणवाला (छत्रपती संभाजीनगर) यांच्या वतीने दिला जाणार आहे. भक्तीभावाने सहभागी होणाऱ्या भाविकांसाठी हा महाप्रसाद विशेष आकर्षण ठरणार आहे.

कार्यक्रमाचे मंच संचालन 'बोली सम्राट' प्रविण लोहाडे करणार असून, त्यांच्या प्रभावी शैलीतून कार्यक्रम अधिक रंगतदार होणार आहे. संपूर्ण आयोजन यशस्वी करण्यासाठी ट्रस्टचे पदाधिकारी व विश्वस्त मंडळ परिश्रम घेत आहेत.

या महोत्सवात सहभागी होण्याचे आवाहन अध्यक्ष महावीर बडजाते, महामंत्री विलास पहाडे, कोषाध्यक्ष विजय पापडीवाल, विश्वस्त जयकुमार बाकलीवाल, प्रमोद कासलीवाल, मनोज काला, प्रकाश कासलीवाल, कैलास पाटणी, किशोर भाकरे, सुमीत गंगवाल, डॉ. संजय गंगवाल, डॉ. राजेंद्र काला, स्वदेश पांडे, अभिजीत काला यांच्यासह संपूर्ण विश्वस्त मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे. याबाबतची माहिती महामंत्री विलास पहाडे यांनी दिली असून, प्रचार-प्रसार संयोजक नरेंद्र अजमेरा व पियुष कासलीवाल यांनी याची अधिकृत माहिती दिली आहे.

या महामस्तक अभिषेक महोत्सवासाठी छत्रपती संभाजीनगर, हैद्राबाद, मुंबई, पुणे, नाशिक, जयपूर, राजस्थान, दिल्ली आदी ठिकाणांहून हजारो भाविक येणार असल्याने पैठण नगरीत मोठ्या प्रमाणात भक्तीमय आणि उत्सवाचे वातावरण निर्माण होणार आहे. शनि अमावस्येच्या या पावन दिवशी अभिषेक, दर्शन व महाप्रसादाचा लाभ घेण्यासाठी धर्मप्रेमी व तीर्थभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# डिजिटल युगातील कामगाराचे स्वातंत्र्य : 'राईट टू डिस्कनेक्ट' विधेयक २०२५ चा समाजशास्त्रीय मागोवा

आजचे जग झपाट्याने बदलत आहे. डिजिटल तंत्रज्ञानाने माणसाचे जीवन अधिक सुलभ, वेगवान आणि जोडलेले गेले आहे; परंतु याच तंत्रज्ञानाने काम आणि खासगी आयुष्य यांमधील सीमारेषा पुसट केली आहे. मोबाइल फोन, लॅपटॉप, ई-मेल, व्हॉट्सअॅप, व्हिडीओ कॉल, ऑनलाईन प्लॅटफॉर्म यांमुळे कामाची वेळ आता ठराविक कार्यालयीन तासांपुरती मर्यादित राहिलेली नाही. कार्यालय बंद झाले तरी काम मनातून सुटत नाही, सुट्टी असली तरी 'ऑनलाईन' राहण्याचा दबाव कायम असतो. याच पार्श्वभूमीवर 'राईट टू डिस्कनेक्ट' बिल २०२५ हे विधेयक अत्यंत महत्त्वाचे ठरते. हे विधेयक म्हणजे केवळ कर्मचाऱ्यांचा एक नवीन हक्क नाही, तर आधुनिक समाजाच्या कामकाज संस्कृतीवर पुनर्विचार करण्याची गरज अधोरेखित करणारा सामाजिक दस्तऐवज आहे

'राईट टू डिस्कनेक्ट' या संकल्पनेचा अर्थ साधा आहे की कामाचे ठराविक तास संपल्यानंतर कर्मचारी किंवा कामगार यांना कार्यालयीन ई-मेल, फोन कॉल, मेसेज, ऑनलाईन मीटिंग किंवा तत्सम डिजिटल संपर्कांपासून दूर राहण्याचा अधिकार असावा. म्हणजेच, कामाच्या वेळेनंतर कर्मचारी 'ऑफलाइन' राहू शकतो आणि त्यासाठी त्याच्यावर कोणताही अप्रत्यक्ष दबाव, शिक्षा किंवा नकारात्मक मूल्यांकन होऊ नये.

आजच्या काळात अनेक कर्मचारी शारीरिकदृष्ट्या कार्यालयाबाहेर असतात, पण मानसिकदृष्ट्या सतत कामाशी जोडलेले असतात. हा सततचा मानसिक ताण, उपलब्ध राहण्याची अपेक्षा आणि तत्काळ प्रतिसाद देण्याची सक्ती हळूहळू व्यक्तीच्या मानसिक आरोग्यावर, कौटुंबिक जीवनावर आणि सामाजिक नातेसंबंधांवर गंभीर परिणाम करते. त्यामुळे 'राईट टू डिस्कनेक्ट' ही केवळ कामगार कायद्याची तरतूद नसून मानसिक आरोग्य, मानवी प्रतिष्ठा आणि सामाजिक संतुलनाशी जोडलेली मागणी आहे

समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून पाहिल्यास कामाचे स्वरूप हे नेहमीच सामाजिक रचनेशी जोडलेले राहिले आहे. औद्योगिक क्रांतीच्या काळात कामाची वेळ, कारखान्याचे तास, कामगारांचे श्रम हे स्पष्टपणे ठरवले गेले. पुढे कार्यालयीन संस्कृती आली तेव्हा 'नऊ ते पाच' ही वेळ समाजमान्य झाली.

पण डिजिटल युगात ही चौकट मोडली आहे. 'वर्क फ्रॉम होम', 'हायब्रिड वर्क', 'फ्रीलान्सिंग', 'गिग इकॉनॉमी' यांसारख्या संकल्पनांनी काम अधिक लवचिक केले असले, तरी त्याच वेळी कामगारांचे संरक्षण कमकुवत झाले आहे. कर्मचारी कधीही, कुठूनही काम करू शकतो, ही सुविधा जितकी आकर्षक आहे, तितकीच ती शोषणाची शक्यता वाढवणारी आहे. कारण कामाची वेळ ठरलेली नसल्यामुळे कामगार कायम उपलब्ध राहील, अशी अपेक्षा निर्माण होते. 'राईट टू डिस्कनेक्ट' बिल या बदलत्या कामसंस्कृतीत कामगारांचे हक्क पुन्हा ठोसपणे अधोरेखित करते

या विधेयकाचा मुख्य उद्देश म्हणजे काम आणि वैयक्तिक आयुष्य यांमधील संतुलन पुन्हा प्रस्थापित करणे. आधुनिक समाजात व्यक्तीची ओळख केवळ तिच्या कामगिरीवर ठरवली जात आहे. कामाच्या बाहेरचे आयुष्य कुटुंब, विश्रांती, आरोग्य, सामाजिक सहभाग या गोष्टी दुय्यम ठरत चालल्या आहेत. समाजशास्त्र सांगते की जेव्हा व्यक्तीचे सामाजिक आयुष्य आकुंचन पावते, तेव्हा समाजात तणाव, नैराश्य, एकटेपणा आणि मानसिक आजार वाढतात. 'राईट टू डिस्कनेक्ट' हा हक्क व्यक्तीला तिचे आयुष्य केवळ कामापुरते मर्यादित न ठेवता पूर्ण मानव म्हणून जगण्याची मुभा देतो.

काम हे जीवनाचा एक भाग आहे, संपूर्ण जीवन नाही हा संदेश या विधेयकातून अधोरेखित होतो.

या विधेयकात कामगार आणि नियोक्ता यांच्यातील नातेसंबंध नव्या पद्धतीने मांडलेले दिसतात. पारंपरिक अर्थाने नियोक्ता म्हणजे आदेश देणारा आणि कर्मचारी म्हणजे त्याचे पालन करणारा, अशी श्रेणीबद्ध रचना होती. परंतु आधुनिक लोकशाही समाजात कामगारांचे हक्क, प्रतिष्ठा आणि स्वायत्तता मान्य केली जाते. 'राईट टू डिस्कनेक्ट' बिल नियोक्त्यांनाही जबाबदार बनवते. कामाचे तास, आपत्कालीन परिस्थिती, डिजिटल संवादाचे नियम, कर्मचाऱ्यांच्या विश्रांतीचा कालावधी या सर्व बाबी स्पष्टपणे ठरवण्याची अपेक्षा या विधेयकातून व्यक्त होते. त्यामुळे कामाचे नियोजन अधिक शिस्तबद्ध आणि मानवीकेंद्रित होण्याची शक्यता निर्माण होते

महिलांच्या दृष्टीने या विधेयकाचे महत्त्व अधिक आहे. भारतीय समाजात महिलांवर घरकाम, मुलांची जबाबदारी, वृद्धांची काळजी आणि नोकरी असा दुहेरी किंवा तिहेरी भार असतो. 'वर्क फ्रॉम होम'च्या काळात अनेक महिलांना कार्यालयीन काम आणि घरगुती जबाबदाऱ्या एकाच वेळी सांभाळाव्या लागल्या आहेत. कामाची ठराविक वेळ नसल्यामुळे महिलांच्या विश्रांतीचा वेळ जवळजवळ नाहीसा झाला. 'राईट टू डिस्कनेक्ट' हक्क महिलांना मानसिक मोकळीक देऊ शकतो, कारण तो कामाच्या अपेक्षा मर्यादित करतो आणि वैयक्तिक वेळेचा सन्मान करतो. समाजशास्त्रीयदृष्ट्या हा हक्क लिंगसमतेच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल ठरू शकतो

तरुण पिढीसाठीही हे विधेयक तितकेच महत्त्वाचे आहे. आजची तरुणाई स्पर्धात्मक वातावरणात काम करत आहे. सतत 'ऑनलाईन' राहणे, तत्काळ प्रतिसाद देणे, जास्त वेळ काम करणे हेच यशाचे मोजमाप बनले आहे. या दबावामुळे बर्नआउट, चिंता, नैराश्य, झोपेचे विकार यांचे प्रमाण वाढत आहे. समाजशास्त्रात याला 'डिजिटल थकवा' असे म्हटले जाते. 'राईट टू डिस्कनेक्ट' बिल तरुण पिढीला हे शिकवते की स्वतःची काळजी घेणे, विश्रांती घेणे आणि कामापासून दूर राहणे हे कमजोरी नाही, तर निरोगी जीवनाचे लक्षण आहे.

या विधेयकाचा प्रभाव केवळ वैयक्तिक पातळीवर मर्यादित राहत नाही, तर तो संपूर्ण समाजावर परिणाम करतो. जेव्हा कर्मचारी मानसिकदृष्ट्या तणावमुक्त असतो, तेव्हा तो अधिक सर्जनशील, उत्पादक आणि समाधानी असतो. याचा फायदा उद्योगांनाही होतो.

कामगारांचे आरोग्य बिघडले, तर उत्पादकता घटते, अनुपस्थिती वाढते आणि सामाजिक आरोग्यव्यवस्थेवर ताण येतो. त्यामुळे 'राईट टू डिस्कनेक्ट' हा हक्क अर्थव्यवस्थेच्या दृष्टीनेही दीर्घकालीनदृष्ट्या फायदेशीर ठरू शकतो.

समाजशास्त्रीय दृष्टीने पाहिल्यास हे विधेयक आधुनिक भांडवलशाही व्यवस्थेतील अति-उत्पादन आणि अति-काम या प्रवृत्तीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करते. सतत काम, सतत उपलब्धता आणि कार्यक्षमतेची अतिरेकी अपेक्षा ही माणसाला यंत्रासारखे वागवते. 'राईट टू डिस्कनेक्ट' ही संकल्पना माणूस केंद्रस्थानी ठेवणाऱ्या विकासाच्या विचाराशी जोडलेली आहे. विकास म्हणजे केवळ आर्थिक आकडे नव्हेत, तर मानवी सुख, आरोग्य आणि सामाजिक नातेसंबंध यांचाही समावेश असावा, ही भूमिका या विधेयकातून अधोरेखित होते.

वर्तमानपत्राच्या माध्यमातून सर्वसामान्य लोकांपर्यंत या विधेयकाची माहिती पोहोचणे अत्यंत आवश्यक आहे. कारण अनेक कर्मचारी अजूनही हे मान्य करत नाहीत की कामाच्या वेळेनंतर 'नाही' म्हणणे हा त्यांचा हक्क आहे. समाजात ही जाणीव निर्माण झाली, तर कामसंस्कृतीत बदल घडू शकतो. कार्यालयीन ई-मेलला तात्काळ उत्तर देणे ही निष्ठा नसून, विश्रांतीचा सन्मान करणे ही खरी जबाबदारी आहे, असा दृष्टिकोन विकसित होणे गरजेचे आहे. 'राईट टू डिस्कनेक्ट' बिल हा बदल घडवून आणण्याचा प्रयत्न आहे.

शेवटी असे म्हणता येईल की 'राईट टू डिस्कनेक्ट' बिल २०२५ हे केवळ कायदेशीर तरतुदींचे संकलन नाही, तर आधुनिक समाजाला आरसा दाखवणारे विधेयक आहे. ते आपल्याला विचारायला भाग पाडते. आपण कामासाठी जगतो आहोत की जगण्यासाठी काम करतो आहोत? काम आणि आयुष्य यांच्यातील सीमारेषा पुन्हा स्पष्ट करणे, मानवी प्रतिष्ठेला प्राधान्य देणे आणि तंत्रज्ञानावर माणसाचे नियंत्रण प्रस्थापित करणे हा या विधेयकाचा गाभा आहे.

समाजाने, उद्योगांनी आणि शासनाने मिळून हा विचार स्वीकारला, तरच 'राईट टू डिस्कनेक्ट' हा केवळ कायद्यातील शब्द न राहता प्रत्यक्ष जीवनातील अनुभव बनेल.

**-डॉ. राजेंद्र बगाटे, (लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

# संक्षिप्त

## पिंपरखेडा (गेवराई)येथील कल्याणी जयभार भूवैज्ञानिक अधिकारी म्हणून निवड

**आत्ताच एक्सप्रेस**
**पिंपरखेडा (गेवराई) प्रतिनिधी/** येथील कल्याणी भारती जाईबहार यांना भूवैज्ञानिक अधिकारी म्हणून निवड झाल्याचे खूपच आनंददायी वृत्त आहे. कल्याणी भारती हे एक आदर्श उदाहरण आहे की कठोर मेहनत, चिकाटी आणि जिद्द यांद्वारे कोणत्याही परिस्थितीत यश मिळवता येते. त्यांच्या शिक्षणाच्या प्रवासाची कथा अत्यंत प्रेरणादायी आहे. कल्याणी भारती पिंपरखेडा येथील एक साध्या आर्थिक परिस्थितीतील कुटुंबात जन्मलेल्या. त्यांच्या कुटुंबात दोन मुली आणि त्यांची आई भारती होत्या. लहानपणातच वडीलांचे निधन झाले, त्यामुळे त्यांच्या आईने मोलमजुरी करून आणि शिवणकाम करून त्यांचे शिक्षण चालू ठेवले. अशा परिस्थितीतही कल्याणीने शिक्षणासाठी आपली जिद्द कमी केली नाही. त्यांनी प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पिंपरखेडा येथे केले आणि नंतर जिजामाता माध्यमिक विद्यालयातून आठवी ते



दहावीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. महात्मा फुले पिशोर येथून त्यांनी एकादिवशी बारावीपर्यंत शिक्षण पूर्ण केले.

शिक्षणाची आवड आणि निष्ठा त्यांना पुढे घेऊन गेली. २०११ मध्ये त्यांचे लग्न श्री. तान्हाजी सांडू घोडके (गेवराई, गुंगी, फुलंब्री) यांच्याशी झाले. त्यांच्या पतींनी कल्याणीच्या शिक्षणासाठी संपूर्ण सहकार्य केले आणि पुढील शिक्षणासाठी प्रेरित केले. २०१२ ते २०१५ मध्ये त्यांनी देवगिरी कॉलेज, छत्रपती संभाजीनगर येथून Bachelor of Science पदवी प्राप्त केली. त्यानंतर २०१५ ते २०१७ मध्ये Government Institute of Science, छत्रपती संभाजीनगर येथून Master of Science in Geology पूर्ण केले. कल्याणीची शैक्षणिक उत्सुकता यामुळेच २०१७ आणि २०१८ मध्ये त्यांना Mangalore University मध्ये ठशीशरीलह डलहेश्री म्हणून निवड झाली. २०१९ मध्ये त्यांनी आईपणाचा अनुभव घेतला; एका बाळाची जन्म झाली, ज्यामुळे काही काळ अभ्यासात थांबा आला. मात्र, २०२२ पासून त्यांनी नव्याने अभ्यास सुरू केला आणि अखेर १० डिसेंबर २०२५ रोजी चझडउ मधून भूजल सर्वेक्षण विकास आणि यंत्रणा (GSDA) मध्ये कनिष्ठ भूवैज्ञानिक अधिकारी गट ब राजपत्रित अधिकारी म्हणून निवड झाली. कल्याणीच्या या यशामध्ये त्यांच्या कुटुंबियांचा, शिक्षकांचा, मित्र-मैत्रिणींचा, गावकऱ्यांचा आणि नातेवाईकांचा मोलाचा वाटा आहे. त्यांचे पती श्री. तान्हाजी सांडू घोडके पीएचडी पूर्ण करून संशोधन अमेरिकेत आणि लिथुआनियात सादर करतात, तर लहान मुलगा किशोर घोडके भू-खणीकर्म अधिकारी आहे. या सर्वांनी वेळोवेळी कल्याणीला मार्गदर्शन आणि प्रेरणा दिली. कल्याणी जाईबहार यांनी सांगितले की, कुठलीही गोष्ट मिळवण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले तर यश निश्चितच मिळते. त्यांच्या कष्टाने आणि जिद्दिने त्यांनी स्वतःसाठी आणि समाजासाठी एक आदर्श निर्माण केला आहे. त्यांच्या जीवनकथेतील संघर्ष, चिकाटी आणि यश इतरांसाठी प्रेरणा आहे. या यशामुळे पिंपरखेडा आणि संपूर्ण तालुक्यातील तरुण विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी उदाहरण समोर आले आहे. कल्याणीच्या कथेने हे स्पष्ट केले आहे की आर्थिक अडचणी, कौटुंबिक जबाबदाऱ्या किंवा व्यक्तिगत अडथळे कधीही मनोबल कमी करू शकत नाहीत; फक्त चिकाटी, मेहनत आणि ध्येय निश्चित केल्यास कोणताही आकाशस्पर्श शक्य आहे. त्यांच्या यशाचा आनंद त्यांच्या कुटुंब, शिक्षक, मित्र, सहकारी आणि संपूर्ण गावकऱ्यांसोबत साजरा करणे योग्य आहे.

## कन्नड तालुक्यातील अंधानेर परिसरात गौण खनिजाचा बेसुमार अवैध उपसा
## तक्रार करूनही महसूल विभागाची उदासीनता - समाजसेवकाचा आरोप

**आत्ताच एक्सप्रेस**
**कन्नड प्रतिनिधी / उदय कुलकर्णी/** कन्नड तालुक्यातील अंधानेर परिसरात बेकायदेशीर व विनापरवाना मुरूम व इतर गौण खनिजांचा खुलेआम आणि राजरोसपणे उपसा सुरू असून, याबाबत लेखी तक्रार देऊनही कन्नड महसूल विभागाला अद्याप जाग आली नसल्याचा गंभीर आरोप समाजसेवक प्रवीण उर्फ बंटी काशिनंद यांनी केला आहे.

यासंदर्भात बंटी काशिनंद यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले की, अंधानेर परिसरात सुरू असलेल्या अवैध गौण खनिज उपशाबाबत त्यांनी दिनांक १५ रोजी प्रभारी तहसीलदार दिलीपकुमार सोनवणे यांच्याकडे लेखी तक्रार दिली होती. तसेच अवैधरित्या सुरू असलेल्या वाहतूकदारांवर व वाहन मालकांवर तातडीने कारवाई करण्याची मागणी तहसीलदार तसेच उपविभागीय अधिकारी, कन्नड यांच्याकडे करण्यात आली होती. मात्र, अद्यापपर्यंत कोणतीही ठोस कारवाई झालेली दिसून आलेली नाही.

तक्रार निवेदनात त्यांनी नमूद केले आहे की, अंधानेर शिवारातील गट क्रमांक ५७ मधून सुमारे ५० ब्रास मुरूम अवैधरित्या उपसा करण्यात आला. या वाहतुकीसाठी कोणतीही आवक-जावक नोंद नसताना, तसेच संबंधित वाहनांकडे आरटीओ फिटनेस व जीपीएस प्रणाली नसतानाही गौण खनिजांची वाहतूक कशी काय करण्यात आली, असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे.



याशिवाय, सदर उपसा हा शासकीय सुट्टीच्या कालावधीत करण्यात आल्याचा आरोपही करण्यात आला असून, तहसील कार्यालयातील लिपिक दुभाळकर व कोतवाल शेजवळ यांनी कथित चिरीमिरीचा व्यवहार करून चार दिवसांची मुदतवाढ दिल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या मुदतवाढीच्या कालावधीत संबंधित माफियांकडून सुमारे ३०० ते ४०० ब्रास मुरूमाची अवैध वाहतूक करण्यात आल्याचा दावा तक्रारदारांनी केला आहे. यामुळे शासनाच्या महसूलाचे मोठे नुकसान झाल्याचा आरोपही त्यांनी केला आहे.

विशेष म्हणजे, या प्रकरणाची प्राथमिक चौकशी करण्यासाठी महसूल विभागाकडून अद्याप साधा तलाठीसुद्धा घटनास्थळी आलेला नसल्याचे त्यांनी सांगितले. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी जर या प्रकरणाची तातडीने दखल घेतली नाही, तर न्यायालयात दाद मागण्याचा इशारा देखील त्यांनी दिला आहे.

दरम्यान, या प्रकरणासंदर्भात आमच्या प्रतिनिधींनी प्रभारी तहसीलदार दिलीपकुमार सोनवणे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की, मुरूम उत्खननासाठी रीतसर परवानगी घेण्यात आलेली होती. सर्व आरोप हे राजकीय द्वेषापोटी करण्यात आले असून सध्या संबंधित वाहतूक थांबविण्यात आली आहे. मात्र, चिरीमिरीच्या आरोपांबाबत त्यांनी बोलणे टाळले.

## फुलंब्री तालुक्यात थंडी वाढली, नागरिकांची शेकोटीजवळ धाव

**आत्ताच एक्सप्रेस**
**फुलंब्री प्रतिनिधी/** फुलंब्री शहर व ग्रामीण भागात थंडी वाढली आहे, थंडी पासुन बचवासाठी नागरिक शेकोटी जवळ धाव घेत आहे.

सध्या डिसेंबर महिना सुरु आहे, आजुनही दोन ते अडीच



महिने थंडी राहील असे सांगितले जात आहे.

सध्या रब्बी हंगाम सुरु आहे सगळीकडे शेतकरी रब्बी हंगामातील पिकांची पेरणी केली असल्याने थंडीत गहु हरभरा व इतर पिकांना पाणी देण्यात येत आहे. सध्या सगळीकडे थंडी वाढली असल्याने फुलंब्री शहरातील नागरिक स्वेटर जॉकेट, मफलर, टोपी घालत आहे.

तसेच उबदार कपडे घालत आहे. फुलंब्री नगरपंचायतीची निवडणुकीची धामधुम सुरु असल्याने शहरातील नागरिक थंडीतही गरमागरम चर्चा करत आहे. येत्या २० डिसेंबर रोजी मतदान होणार असल्याने आतापासुनच राजकीय गरमा गरम चर्चा रंगत आहे.

**थंडीत आरोग्याला पोष्टीक आहार चांगला**

थंडीत आरोग्याला पोष्टीक आहार म्हणून मेथीचे लाडु चांगले असल्याने नागरिकांनी लाडु बनवले आहे ते खात आहे.

मेथी च्या लाडुला, खारीक खोबरा, मेथी, गुळ यासह अदी सामन लागत असल्याने त्याचे पण भाव वाढले आहे.

## प्रशासनाने लोकाभिमुख व पारदर्शकपणे कार्य करावे - मुख्य सचिव राजेश अग्रवाल

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी/** शासनाच्या विविध कल्याणकारी योजना राबविताना त्या योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी प्रशासनाने लोकाभिमुख राहून पारदर्शकपणे कार्य करावे, असे निर्देश राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी दिले.

विभागीय आयुक्त कार्यालयाच्या सभागृहात छत्रपती संभाजीनगर विभागाची आढावा बैठक मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. यावेळी विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, विभागातील आठही जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत मुख्य सचिवांनी प्रत्येक जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या विविध शासकीय योजनांची सविस्तर माहिती घेतली. योजनांच्या अंमलबजावणी दरम्यान येणाऱ्या अडचणी तत्काळ दूर करून कामांना गती देण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. नागरिकांना योजनांची माहिती सहज, सुलभ व स्थानिक भाषेत दिली जावी, तसेच त्यांच्या समस्या समजून घेऊन तातडीने निराकरण करण्यात यावे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

योजना प्रभावीपणे राबविताना विविध विभागांतील अधिकाऱ्यांनी परस्पर समन्वय साधून काम करणे अत्यंत आवश्यक असल्याचे सांगत, प्रशासनाबाबत सर्वसामान्य नागरिकांमध्ये सकारात्मकता निर्माण होणे गरजेचे असल्याचे मुख्य सचिव म्हणाले.

शासकीय योजनांचा लाभ थेट नागरिकांपर्यंत पोहोचावा यासाठी प्रशासनाने समन्वयाने काम करावे. प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढून सेवा देताना पारदर्शकता, गती महत्वाची आहे असे त्यांनी सांगितले.

बैठकीत महसूल विभागाच्या कामकाजाचा आढावा घेताना जमिनीचे प्रश्न, नैसर्गिक आपत्तीमुळे उद्भवणाऱ्या बाबी, तसेच शासकीय सेवा अधिक सुलभ व पारदर्शक करण्याबाबत सविस्तर चर्चा झाली. यासह प्रमुख पायाभूत प्रकल्प, विविध विभागांच्या मंजुरीअभावी प्रलंबित असलेले प्रकल्प, प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण), मुख्यमंत्री कृषी सौर योजना, ग्रामीण भागातील उद्योगविकास, तसेच सातबारावरील खरेदी-विक्री व्यवहारांबाबतही मुख्य सचिवांनी सखोल आढावा घेतला.



विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी छत्रपती संभाजीनगर विभागात राबविण्यात येत असलेल्या विविध शासकीय योजनांची सद्यस्थिती, अंमलबजावणीतील प्रगती तसेच भविष्यातील नियोजन याबाबत सविस्तर माहिती दिली.

यावेळी संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

## पंचवीस वर्षांपासून प्रलंबित प्रश्नांमुळे ग्रामस्थांचा संताप; जलसमाधी आंदोलन तात्पुरते मागे

### (रामनगर येथील प्रलंबित कामांबाबत अधिकाऱ्यांसोबत होणाऱ्या बैठकीत तोडगा न निघाल्यास जलसमाधी आंदोलन पुन्हा छेडण्याचा इशारा)

**आत्ताच एक्सप्रेस**
**कन्नड ग्रामीण प्रतिनिधी/ सुनिल निकम/** कन्नड तालुक्यातील रामनगर गावातील तब्बल पंचवीस वर्षांपासून प्रलंबित असलेल्या मूलभूत सुविधांच्या प्रश्नांमुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. प्रशासनाकडून वेळोवेळी देण्यात आलेल्या आश्वासनांची अद्याप पूर्तता न झाल्याने ग्रामस्थ आणि सामाजिक कार्यकर्ते संतप्त झाले असून, अखेर त्यांनी अंजना-पळशी मध्यम प्रकल्पाच्या पाण्यात उतरून जलसमाधी आंदोलन करण्याचा इशारा दिला होता.

अंजना-पळशी मध्यम प्रकल्पामुळे रामनगर गावाचे पुनर्वसन करण्यात आले. मात्र पुनर्वसनानंतर जवळपास २५ वर्षे उलटूनही गावात आवश्यक त्या मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेल्या नाहीत. आजही गावात स्मशानभूमी व दफनभूमीसाठी स्वतंत्र जागा नाही, सांडपाणी व्यवस्थेचा अभाव आहे, अंतर्गत रस्त्यांची दुरवस्था आहे तसेच पथदिवे नसल्याने रात्रीच्या वेळी नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. या समस्यांकडे वारंवार लक्ष वेधूनही प्रशासनाकडून ठोस कारवाई होत नसल्याने ग्रामस्थांमध्ये प्रचंड नाराजी आहे.

या प्रश्नांच्या निराकरणासाठी ग्रामस्थांनी यापूर्वी अनेक वेळा उपोषण, आंदोलन, कामबंद बहिष्कार अशा विविध मार्गांनी प्रशासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. संबंधित विभागांना अनेकदा लेखी निवेदने देण्यात आली. दोन वेळा पोलिस



बंदोबस्तात शासकीय मोजणीही करण्यात आली होती. मात्र प्रत्यक्षात कोणतेही काम सुरू न झाल्याने समस्या जशाच्या तशा कायम राहिल्या आहेत.

या पार्श्वभूमीवर सोमवारी (ता. १५) कारभारी खुर्दे, विष्णू तायडे गावंडे, आकाश शेळके, कैलास खुर्दे, रघुनाथ गव्हांडे, रामहरी सोनवणे व बाळू निकम या ग्रामस्थांनी अंजना-पळशी प्रकल्पाच्या पाण्यात उतरून जलसमाधी आंदोलन करण्याचा प्रयत्न केला. ग्रामस्थांचा हा टोकाचा निर्णय प्रशासनासाठी इशाराच मानला जात आहे. या घटनेची माहिती मिळताच प्रभारी तहसीलदार दिलीप सोनवणे, विस्तार अधिकारी, महसूल सहाय्यक योगेश सोनवणे, मंडळ अधिकारी अलका पटरे तसेच तलाठी यांच्या पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेऊन ग्रामस्थांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. दीर्घ चर्चा व समुपदेशनानंतर प्रशासनाकडून या प्रश्नांवर गांभीर्याने विचार करण्यात येईल, असे आश्वासन देण्यात आले. दरम्यान, या सर्व प्रलंबित प्रश्नांवर सविस्तर चर्चा करून तोडगा काढण्यासाठी बुधवारी (ता. १७) गटविकास अधिकारी यांच्या कार्यालयात संबंधित सर्व विभागांच्या अधिकाऱ्यांसोबत संयुक्त बैठक आयोजित करण्यात येणार असल्याचे लेखी आश्वासन प्रशासनाकडून देण्यात आले. या लेखी आश्वासनानंतर ग्रामस्थांनी सदर जलसमाधी आंदोलन तात्पुरते मागे घेतले आहे. मात्र बैठकीत ठोस निर्णय न झाल्यास पुन्हा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही ग्रामस्थांनी दिला आहे.

घटनास्थळी कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी सहायक पोलिस निरीक्षक शिवाजी नागवे यांच्या मार्गदर्शनाखाली चोख पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. रामनगर येथील नागरिकांच्या या दीर्घकालीन प्रश्नांकडे प्रशासन गांभीर्याने पाहून तातडीने कार्यवाही करेल का, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

## जायकवाडी (ऊ) बाजारतळ येथे पाटबंधारे विभागाची अतिक्रमणविरोधी कारवाई; नागरिकांचा तीव्र विरोध

**आत्ताच एक्सप्रेस**
**पिंपळवाडी प्रतिनिधी/ हारुन शेख/** पैठण तालुक्यातील जायकवाडी वसाहतीत पाटबंधारे विभागाने राबवलेल्या अतिक्रमणविरोधी कारवाईमुळे परिसरात मोठी चालवत जमीनदोस्त केले.

यानंतर आज सोमवार दि. १५ रोजी पाटबंधारे विभागाच्या अतिक्रमणविरोधी पथकाने आपला मोर्चा जायकवाडी उत्तर येथील बाजारतळ परिसराकडे वळवला. या ठिकाणी गेल्या आंदोलन करत आपला संताप व्यक्त केला. या आंदोलनामुळे काही काळ वाहतूक ठप्प झाली होती. वाढता तणाव लक्षात घेता प्रशासनाने तात्पुरत्या स्वरूपात अतिक्रमण हटवण्याची कारवाई थांबवली.



खळबळ उडाली आहे. अंदाजे २५ वर्षांपासून वास्तव्यास असलेल्या सुमारे पाच हजार अतिक्रमणधारक रहिवाशांमध्ये या कारवाईमुळे भीती व अस्वस्थतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

नागरिकांच्या भावना आणि सामाजिक परिस्थितीची कोणतीही दखल न घेता पाटबंधारे विभागाच्या अतिक्रमण हटाव पथकाने शासकीय जागेवर उभारण्यात आलेल्या निवासस्थानांवर बुलडोझर

दहा वर्षांहून अधिक काळापासून मोलमजुरी करून उदरनिर्वाह करणारे अनेक गरीब व कष्टकरी कुटुंबीय कच्ची घरे बांधून वास्तव्यास आहेत. अचानक सुरू झालेल्या अतिक्रमण हटाव कारवाईमुळे येथील नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली.

अतिक्रमणधारक नागरिकांनी कारवाईला तीव्र विरोध करत प्रशासनाविरोधात घोषणाबाजी केली. परिस्थिती अधिक चिघळत असल्याचे लक्षात येताच नागरिकांनी रास्ता रोको

सध्या पाटबंधारे विभागाचे अधिकारी आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी बैठक घेत आहेत. अतिक्रमणधारक नागरिकांनी आपल्यावर अन्याय होत असल्याची भावना व्यक्त करत, पुनर्वसनाची ठोस व्यवस्था केल्याशिवाय कारवाई करू नये अशी मागणी केली आहे.

या प्रकरणावर पुढे काय निर्णय घेतला जातो, याकडे संपूर्ण जायकवाडी व परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र
आत्ताच एक्सप्रेस


# राष्ट्रीय लोकन्यायालयात तडजोडीने १ हजार १०४ प्रकरणे निकाली

**आत्ताच एक्सप्रेस**
**जालना प्रतिनिधी/** उच्च न्यायालय,महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण मुंबई यांच्या निर्देशानुसार आणि न्यायमुर्ती उच्च न्यायालय मुंबई,न्यायमुर्ती उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ,येथील न्यायमुर्ती तथा जालना न्यायीक जिल्ह्याचे पालक न्यायमुर्ती अरूण आर. पेडणेकर ह्यांनी दुरदृश्यप्रणालीव्दारे उपस्थित राहून मार्गदर्शन केले.जिल्हा विधी सेवा प्राधिकरण अध्यक्षा तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश वर्षा एम.मोहिते यांच्या उपस्थितीत शनिवार दिनांक १३ डिसेंबर २०२५ रोजी जालना जिल्ह्यातील सर्व न्यायालयात लोकन्यायालयाचे आयोजन करण्यात आले होते.




दिनांक १३ डिसेंबर रोजी पार पडलेल्या लोकन्यायालयामध्ये प्रलंबित व दावा दाखलपुर्व अशी सुमारे ३९ हजार ८२३ प्रकरणे ठेवण्यात आली होती.त्यापैकी १ हजार १०४ प्रकरणे तडजोडीने निकाली निघाली आहे.जिल्ह्यामधील न्यायालयात प्रलंबित प्रकरणापैकी एकूण ५ हजार ७०० प्रकरणे लोकन्यायालयासाठी ठेवण्यात आली होती.यात दिवाणी,फौजदारी,मोटार अपघात,भूसंपादन आणि १३८ एन.आय. क्टच्या प्रकारणांचा समावेश होता.त्यापैकी ५४२ प्रकरणे निकाली निघाली आहे.तर दाखलपुर्व ३४ हजार १२३ प्रकरणांपैकी सुमारे ५६२ प्रकरणे निकाली निघाली आहे. अशी एकुण १ हजार १०४ प्रकरणे निकाली काढण्यात आली. लोकन्यालयामध्ये १७ कोटी ४ लाख ७० हजार ५४६ एवढ्या रकमेची प्रकरणे निकाली निघालेली आहे. तसेच कौटुंबिक न्यायालयातील प्रलंबित प्रकरणातील लोकन्यायालयामध्ये ठेवण्यात आलेल्या प्रकरणांपैकी ५ परिवारांचा संसार सुखाचा झाला असून पाचही महिला आपल्या पतीच्या घरी नांदण्याकरिता गेल्या आहेत.

यावेळी जिल्हा न्यायाधीश एन.एस. शेख,जिल्हा न्यायाधीश आर.बी. पारवेकर, तदर्थ जिल्हा न्यायाधीश जी.आर.ढेपे, सचिव,जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,जालना नितेश एम.बंडगर आणि जालना मुख्यालयातील सर्व न्यायीक अधिकारी, जालना जिल्हा वकील संघ अध्यक्ष अनिरूध्द बी.घुले पाटील,जिल्हा वकील संघाचे सर्व पदाधीकारी,सर्व विधिज्ञ,जिल्हा सरकारी वकील,जिल्हा सरकारी अभियोक्ता यांची उपस्थिती होती.असे प्रभारी सचिव,जिल्हा विधी सेवा प्राधिकरण जालना,यांनी प्रसिध्दीपत्रकाव्दारे कळविले आहे.

# लखमापुरीत हमीभावाने शेतमाल खरेदीसाठी शेतकऱ्यांची नोंदणी सुरु

**आत्ताच एक्सप्रेस**
**अंबड प्रतिनिधी /** अंबड तालुक्यातील लखमापुरी येथे नाफेडच्या भाव स्थिरीकरण योजना (झडड)* अंतर्गत सन २०२५-२६ साठी हमीभावाने सोयाबीन, मूग व उडीद खरेदीसाठी शेतकऱ्यांची नोंदणी मान्यता देण्यात आली आहे.

**या योजनेअंतर्गत**

सोयाबीन : ५,३२८ प्रति क्विंटल, मूग : ८,७६८ प्रति क्विंटल, उडीद : ७,८०० प्रति क्विंटल

या हमीभाव दराने शेतमाल खरेदी करण्यात येणार असल्याची हमीभाव खरेदीसाठी शेतकऱ्यांनी

ऑनलाईन पीकपेरा नोंद असलेला ७/१२ उतारा, आधार कार्ड, बँक पासबुक, मोबाईल क्रमांक सोबत ठेवणे तसेच स्वतः उपस्थित राहणे अनिवार्य असल्याचे डॉ. काळे यांनी स्पष्ट केले.




सुरू करण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळामार्फत अंबड तालुक्यासाठी हरियाली ग्रीन व्हेज फार्मर प्रोड्युसर कंपनी लि., लखमापुरी या शेतकरी उत्पादक कंपनीला खरेदीसाठी माहिती कंपनीचे अध्यक्ष डॉ. श्रीहरी काळे यांनी दिली. हरियाली ग्रीन व्हेज फार्मर प्रोड्युसर कंपनीच्या कार्यालयात शेतकऱ्यांची नोंदणी सुरू असून खरेदी प्रक्रियाही कार्यान्वित करण्यात आली आहे.

हमीभावाने शेतमाल विक्रीची ही संधी शेतकऱ्यांसाठी लाभदायक असून, जास्तीतजास्त शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

# धनगर समाजाच्या एसटी आरक्षणासाठी आमदार बबनराव लोणीकर यांची विधानसभेत ठाम भूमिका; जालन्यात भव्य सत्कार सोहळा संपन्न

**आत्ताच एक्सप्रेस**
**जालना प्रतिनिधी/** नागपूर येथे पार पडलेल्या महाराष्ट्र विधानसभेच्या हिवाळी अधिवेशनात परतूर-मंठा विधानसभा मतदारसंघाचे आमदार, माजी मंत्री तथा भाजपचे ज्येष्ठ नेते बबनराव लोणीकर यांनी धनगर समाजाच्या अनुसूचित जमाती (एसटी) आरक्षणाच्या ज्वलंत आणि दीर्घकाळ प्रलंबित प्रश्नावर तारांकित प्रश्नाद्वारे राज्य सरकारचे लक्ष वेधले. विधानसभेच्या सभागृहात त्यांनी मांडलेली ठाम, स्पष्ट व निर्भीड भूमिका ही धनगर समाजाच्या न्याय्य हक्कांसाठी महत्त्वपूर्ण पाऊल ठरली आहे. त्यांच्या या ठोस भूमिकेबद्दल जालना जिल्ह्यातील धनगर समाज बांधवांच्या वतीने सोमवार, दिनांक १५ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता जालना येथे भव्य सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले.

या सत्कार समारंभाला धनगर समाजातील विविध संघटनांचे पदाधिकारी, ज्येष्ठ नेते, सामाजिक कार्यकर्ते, युवक-युवती, महिला प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

समाजाच्या हक्कासाठी विधानसभेत निर्भयपणे आवाज उठवणाऱ्या आमदार बबनराव लोणीकर यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन यावेळी मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. कार्यक्रमस्थळी समाजबांधवांमध्ये उत्साहाचे वातावरण असून, आमदार लोणीकर हे धनगर समाजासाठी आशेचा किरण ठरले आहेत, अशी भावना अनेकांनी व्यक्त केली.

सत्काराला उत्तर देताना आमदार बबनराव लोणीकर म्हणाले, धनगर समाजाच्या एसटी आरक्षणाचा लढा हा केवळ राजकीय मुद्दा नसून तो सामाजिक न्याय, समता आणि हक्कांचा प्रश्न आहे.

या लढ्यात मी केवळ विधानसभेतच नव्हे, तर रस्त्यावरही समाजाच्या पाठीशी उभा राहीन. उपोषण, रास्ता रोको, मोर्चे अथवा कोणतेही लोकशाही मार्गाने होणारे आंदोलन असो, मी स्वतः त्यामध्ये सहभागी होऊन समाजाच्या न्याय्य मागणीला पाठबळ देईन. त्यांच्या या घोषणेमुळे उपस्थित समाजबांधवांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले.

आमदार लोणीकर यांनी पुढे सांगितले की, धनगर समाजाचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित असून, विविध आयोगांचे अहवाल, ऐतिहासिक दाखले आणि समाजाची वस्तुस्थिती लक्षात घेता एसटी आरक्षणाची मागणी पूर्णपणे न्याय्य आहे. हा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावण्यासाठी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या माध्यमातून विशेष प्रयत्न केले जातील. शासन स्तरावर आवश्यक त्या सर्व प्रक्रियांना गती देण्यासाठी मी सातत्याने पाठपुरावा करणार आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी समाजबांधवांनी आपली भावना व्यक्त करताना सांगितले की, धनगर समाजाच्या एसटी आरक्षणाचा प्रश्न अनेक सरकारांच्या काळात प्रलंबित राहिला आहे.

मात्र, आमदार बबनराव लोणीकर यांनी विधानसभेत तारांकित प्रश्नाद्वारे ठामपणे आवाज उठवल्याने शासन पातळीवर हालचाली सुरू झाल्या असून, समाजामध्ये नव्या अपेक्षा आणि सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे. त्यांच्या या भूमिकेमुळे संपूर्ण राज्यात धनगर समाजाच्या आरक्षणाच्या प्रश्नाला नव्याने बळ मिळाल्याचे चित्र दिसून येत आहे.

या भव्य सत्कार सोहळ्यास राहुल लोणीकर, बळीराम खटके, ओमप्रकाश चितळकर, प्रा. प्रसाद गडदे, कपिल दहेकर, शिवाजी तरवटे, बाळासाहेब गावडे, जारे सर, शांतीलाल बनसोडे, श्रीमंत खटके, तानाजी शेंडगे, महादेव आटोळे, नंदकुमार गांजे, कैलास म्हस्के, विठ्ठल आटोळे, रवी खोमणे, अक्षय आटोळे, राम खरजुले, तुकाराम खरजुले, प्रकाश गडदे, आसाराम सोनवलकर, पंढरीनाथ गडदे, विनोद गडदे, लाला गडदे, स्वप्नील गडदे, हातकडके सर, अच्युत काळे, विकास शिंदे, सुंदर काळे, बादल शिंदे, रावजी देवकर, साहेबराव शेंडगे, साहेबराव काळे, उद्धव काळे, बाळासाहेब काळे, केशव शेंडगे, एकनाथ काळे, नामदेव वोडबे, संतोष शेंडगे यांच्यासह धनगर समाजातील असंख्य ज्येष्ठ नेते, कार्यकर्ते व विविध संघटनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या स्मारकासाठी संपूर्ण निधी देण्याची ठाम ग्वाही**

याच कार्यक्रमात आमदार बबनराव लोणीकर यांनी जालना शहरात उभारण्यात येत असलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या स्मारकाबाबत महत्त्वपूर्ण घोषणा केली. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य, विचार, धर्मनिष्ठा आणि सामाजिक योगदान भावी पिढीपर्यंत पोहोचावे, यासाठी हे स्मारक अत्यंत महत्त्वाचे आहे.

या स्मारकाच्या उभारणीसाठी आवश्यक तेवढा संपूर्ण निधी उपलब्ध करून दिला जाईल. निधीअभावी कोणतीही अडचण येऊ दिली जाणार नाही, अशी ठाम ग्वाही त्यांनी दिली.

धनगर समाजाच्या अस्मितेचे प्रतीक असलेल्या या स्मारकासाठी शासन स्तरावर तसेच इतर सर्व आवश्यक माध्यमांतून निधी उपलब्ध करून देण्यासाठी आपण वैयक्तिकरित्या पाठपुरावा करू, असेही आमदार लोणीकर यांनी स्पष्ट केले. त्यांच्या या घोषणेमुळे उपस्थित समाजबांधवांनी समाधान व्यक्त करत टाळ्यांच्या गजरात त्यांचे अभिनंदन केले.

एकूणच, जालना येथे झालेल्या या सत्कार सोहळ्यामुळे धनगर समाजाच्या एसटी आरक्षणाच्या प्रश्नाला नवसंजीवनी मिळाली असून, समाजाच्या हक्कांसाठी सुरू असलेल्या लढ्याला नवे बळ मिळाल्याचे स्पष्टपणे दिसून आले.

# स्वसंरक्षण शिबीर काळाची गरज - वर्षा पित्ती
# पोलीस दल सातत्याने सेवेसाठी तत्पर - संजय सोनवने

**आत्ताच एक्सप्रेस**
**जालना प्रतिनिधी/** जालना शहरातील शांतीनिकेतन विद्या मंदिर शाळेत जालना जिल्हा पोलीस दलाच्या वतीने मुलींसाठी दोन दिवसीय स्वसंरक्षण शिबीराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरामध्ये विद्यार्थिनींना स्वसंरक्षणाचे महत्त्वाचे धडे देण्यात आले. यावेळी सायबर क्राईम ब्रँचचे प्रमुख संजय सोनवने यांनी विद्यार्थिनींना सविस्तर मार्गदर्शन केले.

सदर प्रशिक्षण जालना येथील कराटेपटू दत्ता पवार, ज्योती पवार व विशाल चौंडी यांनी दिले. प्रशिक्षणादरम्यान विद्यार्थिनींना विविध प्रकारची प्रात्यक्षिके सादर करून प्रत्यक्ष मार्गदर्शन करण्यात आले.

प्रशिक्षणाच्या समारोपप्रसंगी शहरातील रोटरी क्लबच्या वर्षा पित्ती यांनी आवर्जून उपस्थित राहून विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. यावेळी व्यासपीठावर संस्थेचे अध्यक्ष भास्करराव अंबेकर, संचालक अश्विन अंबेकर, माध्यमिक शाळेच्या मुख्याध्यापिका प्रेमला पंडित, प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक ज्ञानेश्वर गाढवे आदी उपस्थित होते.

विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना संजय सोनवने म्हणाले की, पोलीस दल सातत्याने नागरिकांच्या सेवेसाठी तत्पर आहे. महिलांवर किंवा मुलींवर होणाऱ्या अन्याय व अत्याचाराची माहिती तात्काळ पोलिसांना द्यावी. तक्रारदार महिला अथवा मुलीचे नाव गोपनीय ठेवण्यात येते, त्यामुळे कोणतीही भीती बाळगण्याची गरज नाही.

**स्त्री सरस्वतीबरोबरच दुर्गेचेही रूप धारण करू शकते - अश्विन अंबेकर**

यावेळी मार्गदर्शन करताना संस्थेचे संचालक अश्विन अंबेकर म्हणाले की, स्त्री आजच्या काळात पुरुषांच्या बरोबरीने सर्वच क्षेत्रांत कार्यरत आहे. स्त्री सरस्वतीबरोबरच दुर्गेचेही रूप धारण करू शकते, ही जाणीव समाजाने ठेवणे आवश्यक आहे. अशा प्रशिक्षणांच्या माध्यमातून महिला व मुली समाजात अधिक आत्मविश्वासाने वावरतील, यात शंका नाही.

यावेळी मार्गदर्शन करताना वर्षा पित्ती म्हणाल्या की, काळ बदलत आहे आणि त्यानुसार महिलांनीही स्वसंरक्षणासाठी सज्ज असणे गरजेचे




आहे. अशा प्रकारचे प्रशिक्षण घेतल्यास स्वतःचा प्राण वाचवता येतो. कोणत्याही प्रसंगी घाबरून न जाता प्रशिक्षणात सांगितलेल्या उपाययोजना अमलात आणून प्रतिकार करावा.

पोलीस दल व समाजसेवी संस्था नेहमीच आपल्या पाठीशी ठामपणे उभ्या आहेत.

शिबिरात सहभागी सर्व प्रशिक्षणार्थी विद्यार्थिनींना संस्थेचे अध्यक्ष भास्करराव अंबेकर यांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वितरण करून शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी शिक्षिका किर्ती खैरे, चौधरी, कांचन वाघ, अरुणा मांटे, सुमित्रा शर्मा, अंबादास घायाळ, प्रा. विकास राठोड, पांडुरंग वांजे, शिवहरी मांटे यांच्यासह मोठ्या संख्येने विद्यार्थिनी व शिक्षक उपस्थित होते.

# आपल्या जीवनात सद्गुरु आल्याने काय होते? - प.पू. डी. जी. दळवी

**आत्ताच एक्सप्रेस**
**जालना प्रतिनिधी/** आपल्या जीवनात सद्गुरु आल्याने अनेक सकारात्मक बदल घडून येतात. मात्र काही जण प्रश्न उपस्थित करतात की, सद्गुरु केल्याने नेमके काय होते?

आपण अनेक वर्षांपासून सत्संग करत असलो, तरी हे सर्व परमात्म्याची कृपा व देण आहे, असे प्रतिपादन संत निरंकारी मंडळ, छत्रपती संभाजीनगर (सिडको शाखा) येथील संयोजक परम पूज्य डी. जी. दळवी यांनी केले.

ते पुढे म्हणाले की, गुरुर ब्रह्मा, गुरुर विष्णू, गुरुर देवो महेश्वरा असे उगीचच म्हटलेले नाही. सद्गुरूंच्या वचनांचे पालन करणे हेच महत्त्वाचे आहे. त्यातून काय होते आणि काय होत नाही, या विचारांच्या गुंत्यात अडकू नये, असा सल्लाही त्यांनी दिला.

कुणी आठवड्याची, कुणी पंधरा दिवसांची तर कुणी महिन्यांची संगत करतो. मात्र आपण भगवंताच्या सानिध्यात किती काळ राहतो, हे अधिक महत्त्वाचे आहे. आपण भूतपूर्व आमदार, खासदार किंवा पंतप्रधान पाहिले असतील; पण परमात्मा कधी भूतपूर्व झालेला पाहिला आहे का? कधीच नाही. जे काही घडत आहे, ते सर्व त्याच्या इच्छेनेच घडत आहे, हे सदैव लक्षात ठेवले पाहिजे, असेही दळवी यांनी सांगितले.

यावेळी रोहिदास फुलमाळी, सुनील वाघ, भरत मेवाडे, सूर्यवंशी यांची उपस्थिती होती. जालना शाखेचे संयोजक प.पू. राजकुमार पारसवाणी यांनी प.पू. डी. जी. दळवी यांचा सत्कार केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन किरण गरड यांनी केले.

या कार्यक्रमासाठी शहरी व ग्रामीण भागातून भाविक-भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट अँण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher Sugriv Sopanrao Mundhe Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (Editor - Sugriv Sopanrao Mundhe) Office Ph. : 0240-2474813